# प्रेसनोट

दिनांक २८/१२/२०२३

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नांव | अँन्टी करप्शन ब्युरो अकोला घटक |
| २ | पोस्टे. व अप क्रं. कलम | सिटी कोतवाली, अकोला, अप.क्र. ३०९/२३, क ७ भ्र.प्र.अधि. १९८८ |
| ३ | आरोपीचे नांव, हुद्दा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | आरोपी लोकसेवक श्री शैलेश सुधाकरराव टोपरे, वय ४५ वर्षे, पद– अभिलेखपाल, भुमी अभिलेख कार्यालय अकोला वर्ग–३, रा. अकोला |
| ४ | अपराध घडला तारीख वेळ | ०५/०९/२३ चे १५.२७ ते १६.३७ वा. चे दरम्यान |
| ५ | अप. दाखल दिनांक | २८/१२/२०२३ चे १६.५९ वा. |
| ६ | लाच मागणी केलेली रक्कम | २,०००/– रुपये |
| ७ | पडताळणीमध्ये लाच मागणी केलेली रक्कम | २,०००/– रुपये |
| ८ | स्विकारलेली लाच रक्कम | निरंक |
| ९ | घटनास्थळ | उपअधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, अकोला |

प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद आलोसे. यानी तक्रारदार यांचे पत्नीच्या नावे असलेल्या ग्राम माझोड येथील शेतीची मोजणी केली असुन त्याची मोजणी शीट व नकाशा देण्याकरीता आरोपी लोकसेवक यांनी त्यांचे कार्यालयीन पदाचा व प्रभावाचा दुरुपयोग करुन स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी दोन हजार रूपयांच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. आरोपी यास तक्रारदारावर संशय आल्याने सापळा कारवाई आजमाविता आली नाही.

फिर्यादी यांचे फिर्यादीवरून आ.लो.से. श्री शैलेश सुधाकरराव टोपरे, वय ४२ वर्षे, पद– अभिलेखपाल, भुमी अभिलेख कार्यालय अकोला, वर्ग–३, रा. अकोला यांचे विरूध्द पोस्टे. सिटी कोतवाली, अकोला जि. अकोला येथे अप.क्र ३०९/२०२३, कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक सचिन सावंत, लाप्रवि अकोला हे करीत आहेत.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री मारूती जगताप, लाप्रवि. अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री देवारे, लाप्रवि. अमरावती परिक्षेत्र, अमरावती आणि मा. पोलीस उपअधीक्षक, श्री सपकाळ लाप्रवि. अकोला यांचे मार्गदर्शनाखाली अकोला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली आहे.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अकोला कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधीक्षक श्री शैलेश सपकाळ, लाप्रवि. अकोला यांनी केले आहे.

टोल फ्रि क्रं. १०६४
लाप्रवि. अकोला फोन नं. ०७२४–२४२०३७०
मोबाईल क्र. ९८२२२२१५३१, ८८५५८३०८३०, ९१३००१९०७७
ई मेल आयडी– अकोला dyspacbakola@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप– www.acbmaharashtra.net.in

( सचिन सावंत )
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो अकोला